International Institute of Information Technology
Pune - 411 057.
Inward No. I²It/2011-12/114
Date : Nov 28, 2011

# पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक :
०२०-२५६९१२३३
२५६०१२५७
२५६०१२५८
२५६०१२५९

शैक्षणिक विभाग
गणेशखिंड, पुणे-४११००७.
टेलिग्राफ : 'युनिपुणे'
फॅक्स : ०२०-२५६९१२३३
वेबसाइट : www.unipune.ac.in
इ-मेल : dyracademic@unipune.ac.in

संदर्भ क्र. : सीए/२५४८

दिनांक : २३/११/२०११

प्रति,
मा. अध्यक्ष/सचिव,
इंटरनॉशनल इंन्स्टिटयुट ऑफ इनफॉरमेशन टेक्नॉलॉजी,
पी—१४, राजीव गांधी इन्फोटेक पार्क,
फेज—१, हिंजवडी ता. मुळशाी जि. पुणे

विषय :शैक्षणिक वर्ष २०११—१२ या एका वर्षाकरिता नवीन महाविद्यालय सुरू करण्यास परवानगी देण्याबाबत.

संदर्भ : १)शासन निर्णय क्र.:— टीईम २०११/( प्र,क्र, १८१/२०११)/ताशिं—४, दि. २१/७/२०११

महोदय,

वरील विषयाच्या संदर्भात प्राप्त झालेल्या आदेशानुसार आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेच्या वरील महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०११—१२ या एका वर्षाकरिता प्रथम वर्ष बी.ई.— १. इन्फॉरमेशन टेक्नॉलॉजी २. इ.ॲण्ड टी.सी. ३.कॉम्प्युटर इंजि प्रत्येकी ६०विद्यार्थी प्रवेश क्षमता या अभ्यासक्रमांचे नवीन महाविद्यालय इंटरनॅशनल इन्स्टिटयूट ऑफ इन्फॉरमेशन टेक्नॉलॉजी, पी—१४राजीव गांधी इन्फोटेक पार्क,हिंजवडी, पुणे—४११ ०५७. येथे कायम विना अनुदान तत्त्वावर सुरू करण्यास अहवालातील अटी व शर्तीची पूर्तता विद्यापीठाचे पत्र निर्गमित झाल्यापासून तीन महिन्यांच्या आत पूर्ण करण्याच्या अटीवर परवानगी देण्यात येत आहे.

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ८१ मधील तरतुदींच्या अधिन राहून व पुणे विद्यापीठ अध्यादेश १७१ प्रमाणे बॅकेत ठेव ठेवणे महाविद्यालयावर बंधनकारक आहे. त्याचप्रमाणे नवीन महाविद्यालय सुरू करताना वास्तुशास्त्र परिषद नवी दिल्ली/महाराष्ट्र शासन/विद्यापीठ नियमानुसार आवश्यक प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर सेवकांची नियुक्ती करणे महाविद्यालयावर बंधनकारक राहतील. तसेच पुणे विद्यापीठ व महाराष्ट्र शासनाद्वारे वेळोवेळी अस्तित्वात येणारे नियम आपणास बंधनकारक राहतील, याची नोंद घ्यावी.

आपल्या महाविद्यालयाचा आय.डी.नंबर **(Id.No. PU/PN/Engg./424 /2011)** असा आहे.

कळावे,

आपला विश्वासू,
२०/११/११
उपकुलसचिव
(शैक्षणिक विभाग)

**सोबत : अहवाल.**

C:\Documents and Settings\Administrator\My Documents\letter.doc